# प्रकरण तिसरे

## 'गावठाण' मधील अनुभवांची सामाजिकता

# प्रकरण तिसरे

## 'गावठाण' मधील अनुभवांची सामाजिकता.

प्रस्तावना

गावठाण मधील ग्रामीण समाजजीवन

'गावठाण' मधील असह्य दारिद्रयाचा पदर

'गावठाण' मधील शेतकरी जीवन

'गावठाण' मधील दिसणारा सावकारीचा पाश

'गावठाण' मधील अंधश्रद्धा

'गावठाण' मधील श्रद्धायुक्त भोळ्या समजुती

'गावठाण' मधील लहरी निसर्ग

'गावठाण' मधील रूढी, प्रथा, परंपरा

'गावठाण' मधील संक्रमण अवस्था

माणसांमाणसातील कमालीचे प्रेम

गावठाण' मधील कौटुंबिक संघर्ष

रक्ताच्या नात्यातील तुटलेपण

शेतकऱ्याच्या शेतमालाची परवड

कमालीची सामूहिक भावना

पशू-पक्षी, प्राणी व मातीबद्दल प्रचंड प्रेम

निष्कर्ष

सारांश

संदर्भसूची

... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रकरण तिसरे

# 'गावठाण' मधील अनुभवांची सामाजिकता.

**प्रस्तावना** :

फ्रेंच समाजशास्त्रज्ञ हिप्पोलिन तेन आपल्या समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीत साहित्यावर देश, काल, परिस्थिती या त्रिसुत्रींचा कसा प्रभाव पडतो हे सांगतो, तेनच्या मते 'साहित्य' हे वंश (race), युगप्रवृत्ती (moment), आणि परिस्थिती (mullue) या तीन घटकांच्या परिमाणातून निर्माण होत असते.''[१] तेनने सुचविलेले हे तीनही घटक तसे स्वतंत्र स्वरूपाचे आहेत. या घटकांचा साहित्यिकांच्या जडणघडणीवर परिणाम होत असतो. व त्याचे प्रतिबिंब साहित्यामध्ये उमटत असते. त्यामुळे सर्वसाधारणपणे साहित्य हा समाजाचा आरसा आहे. असा निष्कर्ष काढला जातो. या साहित्यातील समाजिकतेबद्दल डॉ.विद्या व्यव्हारे म्हणतात, ''कलावंत ज्या समाजात वावरतो, त्या समाजातील व्यक्ती त्यांची वृत्ती-प्रवृत्ती, त्यांचे स्वभाव, त्यांची सुख दु:खे, ताण-तणाव या व्यक्ति जीवनविशेषाबरोबरच त्या समाजातील चाली-रीती, आचार-विचार, रुढी-प्रथा इत्यादींशी त्याचा नित्य संबंध येत असतो. त्यातूनच तो आपल्या साहित्यकृतिसाठीची सामग्री घेऊन आपल्या प्रतिभास्पर्शाने त्यांना कलात्मक रूप देऊन साहित्यकृतीत आणीत असतो. साहित्य कृतीत या स्वरूपाचे पडलेले समाजजीवनाचे प्रतिबिंब त्या साहित्यकृतीला एक मूल्य प्राप्त करून देत असते.''[२] व्यवहारे यांचे हे मत सार्थ असेच वाटते. कारण प्रत्येक साहित्यकृतीवर त्या त्या काळाचा, समाजरचनेचा प्रभाव पडल्याचे आपणास दिसून येते. प्रत्येक साहित्यकृती अशी विविध वैशिष्ट्ये घेऊनच आविष्कृत होताना दिसून येते.

या गोष्टीचे प्रत्यंतर कृष्णात खोतांची 'गावठाण' कादंबरी वाचन असताना आपणाला वेळावेळी येते. 'गावठाणची' नायिका आंदी ही ग्रामीण समाजाची व संस्कृतीची एक अविभाज्य अंग आहे. ग्रामीण समाजात वावरणाऱ्या स्त्रिला 'आंदी' ला भोगायला लागणाऱ्या दु:खाप्रमाणे अनेक दु:खाना सामोरे जावे लागते. ही शोकांतिका आंदीच्या जीवनाची

वैयक्तिक स्वरूपाची असली तरी ती प्रातिनिधिक स्वरूपाची आहे. याबद्दल दिंगबर पाध्ये म्हणतात, ''साहित्यात प्रकट होणारा जीवनाशय साहित्याची आविष्कार पद्धती, प्रवृत्ती या सर्वांना सामाजिक संदर्भ असतो. असे म्हटले तरी साहित्य निर्मितीमध्ये व्यक्तिवैशिष्ट्याला अनन्य साधारण महत्त्व असते. विशिष्ट सामाजिक परिस्थितीला व्यक्तिमने विविध प्रकारे प्रतिसाद देऊ शकतात.''[3] पाध्येंच्या मतानुसार साहित्यनिर्मितीमधून व्यक्तिवैशिष्ट्ये व व्यक्तिमने अविष्कृत होताना दिसतात. अशाच पद्धतीने 'गावठाण' मध्ये 'आंदी' ही प्रातिनिधिक स्वरूपात येताना दिसून येते.

गावठाणची नायिका आंदी ही ग्रामीण समाजाचे अविभाज्य असे अंग आहे. तिच्या जीवनात येणाऱ्या दु:खाबरोबरच तिचे हालाकीचे जीवन समाज नकोनकोसे कशाप्रकारे करून टाकतो. याचे प्रत्ययकारी चित्रण लेखकाने केल्याचे दिसून येते. त्याचबरोबर तेथील सण, उत्सव, प्रथा, रूढी परंपरा, समज-गैरसमज, श्रद्धा अंधश्रद्धा, पशुपक्ष्याबद्दल प्रेम, माणसामाणसातील कमालीचे प्रेम, नात्यातील तुटलेपण, शेतकऱ्यांची दुरावस्था, दारिद्रयात पीचत पडलेला समाज यामुळे प्रगतीपासून लांब राहिलेला ग्रामीण माणूस याचं अतिशय समर्पक चित्रण लेखक कृष्णात खोत यांनी केलं आहे.

आनंदी ही सुंदर तरूणी असूनही ग्रामीण व्यवस्थेत भरडली जाते. क्रूर नियतिने तिच्या जीवनाची केलेली ससेहोलपट, तिचे कोसळून पडणे, पुन्हा पुन्हा उभे राहणे व अखंड जीवन संघर्ष करणे याचे प्रानितिधीक चित्रण गावठाणंच्या रूपाने लेखक वाचकांसमोर मांडतो. हे सर्वचित्रण समाजशास्त्रीय समीक्षा पद्धती लावून कोणत्या कसोटीवर बसते तसेच त्यामधून प्रकट होणारी अनुभवांची सामाजिकता कोणती या सर्व गोष्टींचा उहापोह प्रस्तुत प्रबंधलेखक या प्रकरणात करणार आहे.

**गावठाण मधील ग्रामीण समाजजीवन :**

ग्रामीण साहित्यात मानाचे शिलेदार ठरलेल्या अनेक प्रतिभासंपन्न लेखकांनी आपल्या साहित्यकृतीतून ग्रामीण समाजजीवन मांडल्याचे दिसून येते. १९७० नंतर

बहरलेल्या ग्रामीण साहित्याच्या चळवळीमधून १९७० ते ८० च्या दशकात ज्या ग्रामीण साहित्यकृती निर्माण झाल्या त्यामध्ये आपल्याला अधिक वास्तव पातळीवर येऊन लेखकांनी ग्रामीण जीवन चित्रित केल्याचे दिसून येते. त्यामध्ये आनंद यादवांची 'गोतावळा', 'झोंबी', 'घरभिंती', रा.र.बोराडेंची 'पाचोळा', उद्धव शेळकेंची 'धग', शंकर पाटलांची 'टारफुला', ना.धों.महानोरांची 'गांधारी', माडगूळकरांची बनगरवाडी इ.कादंबऱ्यांमधून आपल्याला ग्रामीण समाज जीवन हे अतिशय चांगल्याप्रकारे व वास्तवाला भिडणारे चित्रित झाल्याचे दिसून येते.

अशाच पद्धतीने कृष्णात खोत यांनी आपल्या 'गावठाण' कादंबरीमध्ये अतिशय वास्तवपूर्णरित्या ग्रामीण जीवन चित्रित करून संपूर्ण गावगाडाचा आपल्यासमोर उभा केला आहे. कादंबरी वाचत असताना अस्सल ग्रामीणत्वाचा आविष्कार झाल्याचे आपणास दिसून येते. कृष्णात खोत यांनी अतिशय जिवंतपणे ग्रामीणत्वाचे दर्शन आपणास घडविले आहे. एका लहानशा खेड्यात घडणाऱ्या घडामोंडीवर ही कादंबरी चित्रित झाली असली तरी ते खेडे लेखकाने एवढ्या ताकदीने मांडलेले आहे की ते एक अख्खं अनोळखी खेडं आपल्याला ओळखीच घेऊ लागतं. त्या खेड्यातील संपूर्ण ग्रामीण जीवनाचा पट आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो व मनात कायमच घर करतो. गावठाण या कादंबरीतून आपल्याला ग्रामीण जीवनातील दु:सह दारिद्र्याचे दर्शन होतेच, त्याचबरोबर तेथील लोकांना सतत येणारी संकटे, कष्टकरी समाज, माणसे, ग्रामीण भागातील नाती, नात्यातील कोमलपण, एकीकडे ह्दयासारखी एकमेकांना जपणारी नाती तर दुसरीकडे भीषण असा कौटुंबिक नात्यातील संघर्ष आपल्याला पहावयास मिळतो.

त्याचबरोबर ह्या कादंबरीतून आपल्याला पिकं, गुरंढोरं, मळणी, पेरणी, कापणी, पशुपक्षी, झाडंझुडं, डोंगरदऱ्या, वाऱ्याचा भरार, नदी, कौल घेणारी तांबुजाई, वाघुजाई, विठ्ठलाई अशी श्रद्धास्थाने या सर्व गोष्टींचे आपल्याला विलक्षण दर्शन घडते. हे अस्सल ग्रामीणत्त्व आपल्या मनाचा ठाव घेते.

त्याचबरोबर गावठाणमधून आपल्याला ग्रामीण समाजातील व त्यांच्या जीवनातील अनेक गोष्टींचे प्रत्ययकारी दर्शन होते. त्यामध्ये ग्रामीण जीवनातील असह्य अशा दारिद्र्याबरोबरच तेथील शेतकरी जीवन, शेतकऱ्यांच्या जीवनात घडलेल्या अनेक घडामोडी, त्यांची सुखदु:खे, त्यांचा पशुपक्षी, गुराढोरांशी असणारा जिव्हाळ्याचा संबंध ग्रामीण भागातील भयंकर असा सावकारीचा पाश त्यातून घडणारे गोरगरीब मजूर, शेतकरी त्यांची होणारी पिळवणूक, त्यांची अगतिकता, त्याचबरोबर ग्रामीण भागात येणारी अंधश्रद्धा या अंधश्रद्धेतून घडणाऱ्या अनेक गोष्टी, त्यातून दिसून येणारे गोरगरीब माणसांचे भोळे मन त्यांची होणारी फसवणूक तसेच ग्रामीण भागातील लोकांच्या अनेक श्रद्धा त्यामधून त्यांच्या झालेल्या भोळ्याभाबड्या समजूती त्यातूनच गावातील तांबुजाई, वाघुजाई, विठ्ठलाई, गावची पांढर या श्रद्धा स्थानावर त्यांची असणारी अलोट भक्ती याचे प्रत्यकारी चित्रण होताना दिसते. त्याचबरोबर ग्रामीण भागातील कृषिनिष्ठजीवन त्यांची असणारी निसर्गाधिनता व निसर्गाचा लहरीपणा त्यातून घडणारे शेतकऱ्यांचे प्रचंड हाल व अपरिमित नुकसान याचेही दर्शन होते. तसेच ग्रामीण भागातील अविभाज्य अशा रूढी-प्रथा,परंपरा व या रुढींना, प्रथेंना व परंपरेला बळी पडणारे अनेक जीव त्यातून सर्वसामान्य माणसाच्या जीवनाची होणारी होरपळ या गोष्टींचे ह्दयस्पर्शी चित्रण झाल्याचे दिसून येते.

त्याचपद्धतीने 'गावठाण' मधून आपल्याला ग्रामीण भागातील नातेसंबंध दिसून येतात. यामध्ये असणारी काही जिव्हाळ्याची तर काही भीषण नाती दिसून येतात. त्यामध्ये ह्दयाला भावणारी अशिक्षित अशा ग्रामीण माणसांची दोस्ती त्यामधून एकमेंकाना होणारा मदतीचा हात आपल्याला दिसतो. तसेच कौटुंबिक नात्यातील प्रेमाबरोबरच त्यामधील भयंकर असा घडणारा संघर्ष व रक्ताच्या नात्यातील तुटलेपण आपणास प्रत्ययास येते. याचबरोबर ग्रामीण भागातील कमालीची सामुहिक भावना, शेतकऱ्यांच्या शेतमालाची होणारी नगण्य किंमत त्यामुळे त्याची होणारी परवड दिसून येते. त्याचबरोबर पशुपक्षी, प्राणी व माती याबद्दल ग्रामीण माणसांना असणारं प्रचंड प्रेम आपल्या लक्षात येते. अशाप्रकारे संपूर्ण ग्रामीणत्त्वाचा आविष्कार या कादंबरीत झाल्याचे आपणास दिसून येते.

## 'गावठाण' मधील असह्य दारिद्रयाचा पदर :

कृष्णात खोतांची गावठाण कादंबरी वाचत असताना आपल्याला कादंबरीमधून ग्रामीण भागातील असह्य दारिद्र्याचे दर्शन वारंवार होताना दिसते. कादंबरीची नायिका 'आंदी' ही गरीब शेतकरी कुटूंबात जन्माला येते. जन्मजात शहाणपण लाभलेल्या या आंदीला आयुष्यभर अनेक दु:खाना सामोरे जावे लागते. याचे महत्त्वाचे एक कारण म्हणजे तिच्या आयुष्यात आलेले भयंकर दारिद्र्य होय. आंदीला अगदी सुरवातीपासून शेवटपर्यंत असह्य दारिद्र्याशी संघर्ष करावा लागतो. गरीब कुटुंबात जन्मलेल्या आंदीच्या घरी अठरा विश्वे दारिद्र्य आहे. रात्रंदिन कष्ट करूनही आंदीच्या आईवडीलांना दारिद्र्याचे सतत चटके बसतात. एवढे कष्ट करूनही त्यांच्या आयुष्यात त्यांना एक साधे पण सुरक्षित असे घर करता येत नाही. त्यांचं असणारं जुनं घर म्हाताऱ्या पावसात मोडकळीस येतं. त्याचं वर्णन करताना लेखक म्हणतो, ''सतरा ठेपं दिल्याल तुळ्यास्नी, तुळ्या गाबण्या म्हशीगत दिसत हुत्या. भितिस्नी गरवार बाईच्या पोटागत बोंगा आल्याला. भित्तीची काळजी आवघांडल्याला बाईगत वाटायची,''[४] लेखक पुढे म्हणतो, ''कवा पावसाला कळ यिल नि भित पडलं याचा काय नेम नव्हता.''[५] अशाप्रकारचे दारिद्र्य त्यांच्या वाट्याला आलेल आहे.

त्याचबरोबर आंदीच्या घरी दोन वेळच्या ताज्या जेवणाचीही भ्रांत आहे. आंदी म्हणते, '' मी शिळा भात ताटीत घेटला त्येच्यावं डिस्कीतलं सांबार घेटलं. भात खाल्ला.''[६] अशा पद्धतीचा भूकेचा प्रश्नही आपल्याला 'गावठाण' मधून दिसून येतो, एखाद्या सणाच्या वेळी गावातील सर्व घरे सजवली जातात. अशा घरांचे कादंबरीमधून होणारे दर्शन हे दारिद्र्याची ओळख करून देते. कादबंरीमधून चित्रित होणारे अनेक प्रसंग आपल्याला प्रातिनिधिक स्वरूपात ग्रामीण भागातील दारिद्र्याचे दर्शन घडवितात, आंदीची असणारी मैत्रीण सखी हीचे मोठ्या धुमधडाक्यात लग्न होते. ती मोठ्या घरची सून होते. पण आंदीच्या लग्नाचा प्रश्न तिच्या आईवडीलांसमोर दारिद्र्यामुळे आ वासून उभा राहतो. अशातच तिचे लग्न ठरते. त्यावेळी पैशासाठी तिच्या आई–वडिलांना घरातील रेडा विकावा

लागतो. सावकाराकडून कर्ज काढावे लागते. याचे प्रत्ययकारी चित्रण कादंबरीमध्ये येते. आंदीला बघायला येण्याच्या प्रसंगावेळी तिचे आईवडील आपले मोडकळीस आलेलं घर स्वच्छ करतात. पाव्हणं येणार म्हणून आदल्या दिवशी फाटके कपढे घालून चांगले कपडे स्वच्छ धुवून ठेवतात. पाव्हण्यांसाठी आजूबाजूच्या घरातून घोंगडी आणली जातात. साखरेचा चहा देण्यासाठी साखर विकत आणली जाते. त्याचं वर्णन करताना लेखक म्हणतो, ''सतराजातीचं कप सतरा घरातनं गोळा केलं हुतं. त्यातनं साऱ्यास्नी चहा दिला.''[७] तसेच आंदीची आई तिच्या दादांना म्हणते. ''डोरल्याला रेड्याचं पैसं पुरतील. बाकीच्या अर्ध्या तोळ्याच काय करायचं वं?''[८] त्यातूनच धारंच्या भांड्यांचा प्रश्न असतो. आंदी म्हणते, ''दोन दिसावं लगीन आलं. पैशाचं कायचं जमना धारच्या भांड्यांनी डोळ्यांस्नी धार लागायची वेळ आली.''[९] या साऱ्या प्रसंगातून ग्रामीण भागातील असह्य दारिद्रय आपल्याला दिसून येते.

आंदीच्या लग्नानंतर जेव्हा दोन मुलींवर आंदीला मुलगा होतो. तेव्हा त्याच्या बारशासाठी तिच्या सासरच्या बायका येतात. पण दारिद्रयात पीचत पडलेल्या या कुटूंबाला बारशाचा कार्यक्रम म्हणजे धडकीच भरते, ''बारसं म्हंजी दुष्काळात धोंडा म्हैनाच हुतं. आगुदरच भाकरीला काय न्हवतं. दोनतीन दीस भात उकडून खाल्ला हुता, त्यात या चार पाच बायका, बैल. आई नि दादा दुचमाटून गेलती.''[१०] त्याचबरोबर जेव्हा आंदीचा नवरा भयंकर रोगाने आजारी पडतो. तेव्हा दवाखान्याचा खर्च करण्यासाठी आंदी अंगावरचे सगळे दागिणे मोडते, कर्ज काढते तरीही भागत नाही. तेव्हा ती म्हणते, ''अंगावर हुतं नव्हतं तेवढं दागिणं मोडलं, एक दीस रोजगार थांबला न्हाई. तरी बी भागना! एक एक दिस नुसतं भाताच्या घासावर निजायचं,''[११] अशाच एका प्रसंगात ती म्हणते, ''पीठ संपल हुतं– दळणाचं दाणं बी न्हवतं, चार आठ दिस झालं. कुणी रोजगाराला बलिवलं न्हवतं.''[१२] या अशा अनेक प्रसंगामधून आपल्याला ग्रामीण भागातील असह्य दारिद्रयाचे दर्शन होते. मनाला चटका लागतो.

## 'गावठाण' मधील शेतकरी जीवन :

अनेक ग्रामीण मराठी कादंबरीतून आपल्याला शेतकरी जीवन चित्रित झाल्याचे दिसून येते. कारण ग्रामीण भागाचा शेतकरी हाच केंद्रबिंदू असतो. अशा शेतकऱ्याचे आणि त्यांच्या जीवनाचे दर्शन आपल्याला ग्रामीण साहित्यातून घडत असते. कृष्णात खोतांनी अगदी वास्तव पातळीवर येऊन 'गावठाण' मधून शेतकरी जीवन प्रत्ययकारी पद्धतीने मांडल्याचे आपणास दिसून येते. 'गावठाण'ची नायिका आंदी ही मुळातचं शेतकरी कुटंबात जन्मलेली आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात महत्त्वाच्या असणाऱ्या गोष्टींमध्ये शेती-भाती, मळणी-पेरणी, लावणी, नांगरणी, कापणी, गुरंढोरं, शेळ्यामेंढ्या, पशुपक्षी, झाडंझुडं, डोंगर दऱ्या, श्रद्धा-अंधश्रद्धा, रूढी-परंपरा इत्यादी गोष्टी अपरिहार्यपणे येत असतात. त्यातूनच शेतकरी जीवन आकारास येत असते. अशाप्रकारच्या शेतकरी जीवनातील अनेक प्रसंग गावठाण मधून प्रकट झाल्याचे आपणास दिसून येते.

आंदीच घरचं मुळात शेतकरी असल्यामुळे शेतकऱ्याच्या जीवनात येणाऱ्या अनेक प्रसंगांना त्यांना सामोरं जावं लागतं. त्यामध्ये पहिल्या कोंबड्याला उठणे, जात्यावर दळणे, तर कधी पाण्यावर जाणे या गोष्टी नित्यक्रमाने येतात. आंदी आपल्या आईबद्दल म्हणते, ''तिला कटाळा न्हाई, दिसभरं शेतात रोजगार मिळाला तर रोजगार नि निम्म्या राचं उठून घरातलं.''[१३] अशा पद्धतीने चाललेलं शेतकरी जीवन आपणास दिसून येतं, आंदीच्या घरात आपल्याला अर्धलीची म्हैस, टिक्का रेडा, खिल्लारी गाय, एक पाडी नि पाडं, टिक्की म्हैस, एक शेरडी तिच पालवं हा सारा शेतकरी जीवनाचं चित्रण करणारा गोतावळा दिसून येतो. या ठिकाणी शेतात राबराब राबणारी व शेतीला काळी आई माणणारी माणसं भेटतात. ही माणसं कधी श्रद्धेने तर कधी अंधश्रद्धेने अनेक गोष्टी करताना आपल्याला दिसून येतात. असह्य अशा दारिद्र्यातही ही माणसं आनंदान जगतात. तर कधी छंद म्हणून अनेक गोष्टी करतात. त्यामध्ये पावसाळ्यात 'खेकड्याला जाण्याचा प्रसंग' इत्यादी गोष्टी येत असतात.

शेतकऱ्यांच्या जीवनात नेहमीच पेरणी, लावणी, कापणी, मळणी असे प्रसंग येत असतात. ह्या साऱ्या गोष्टी शेतकरी अतिशय श्रद्धेने आणि भोळ्या समजूतीतून करताना आपल्याला दिसून येतो. दसऱ्याला येणारी भाताची सुगी ही दसऱ्याच्या सणाबरोबर आनंद देणारी ठरते. याबद्दल आंदी म्हणते, ''दसरा आला- दसऱ्यात भाताची सुगी. माणसांची या भाताच्या लाणीची नि दसऱ्याच्या सारवाण-सुरवाणीची एकच झुंबड उडाली.''[१४] अशा सणांच्या प्रसंगी शेतकरी आपली घरे-दारे, भांडी-कुंडी स्वच्छ करतात. सार गाव माणसांनी फुलून जात. सर्वजण आनंदात असतात. अशाच वेळी कापणीची आणि मळणीची गडबड उडलेली असते. ही सारी कामे ही पावसावर अवलंबून असतात. म्हणून शेतकरी ह्या सर्व गोष्टी श्रद्धेने करताना आपल्याला दिसून येतो. ही शेतीची कामे करत असताना अनेक वेळा दमछाक होते. तरीही कामे चालूच राहतात. याबद्दल आंदी म्हणते, ''ऊन झेंडू फुटल्यागत लागत हुतं. भारा आणताना मसुटीच्या चढाचं भ्याच वाटायचं-मला तरी जन्मच आठवायचा. खरं काय करायच? वरीसच्या वरीस शेतात राबायच, घेताना कटाळा का करायचा?''[१५] या मळणीच्या दिवसात तर शेतकऱ्याला या पावसाच्या लहरीपणामुळे कधी दोन घास नीट जेवायला मिळत नाहीत. आंदी म्हणते- ''तवर आभाळं गळाय लागलं. घरावर बारकं बारकं खडं पडल्यागत वाजाय लागलं. तस दादांनी मोठं मोठं घास घेटलं.''[१६] असा हा शेतकरी अतिशय अभिमानाने जगत असतो. त्याला दाणं विकत घेऊन खायची सवय नसते. आंदी म्हणते, ''पिशवीतनं दाणं आणल्याल बघिटलं नि मी वावटुळातल्या कुपागत हालायला लागलो. कुरवाड्याला टोपल्यातलं खायची सवयं- पिशवीत दाणं बघून गलबलून गेलो.''[१७] या अशा अनेक प्रसंगामधून आपल्या समोर शेतकरी जीवन हुबेहुब उभे राहते.

शेतकऱ्याच्या जीवनात येणारे गुर-ढोरं राखायचे प्रसंग त्यातून घडणाऱ्या घटना, त्याला पशुपक्षी प्राण्यांबद्दल वाटणारं विलक्षण प्रेम, त्याची निसर्गाधिनता, सामाजिकता, धार्मिकता, आधुनिकीकरणामुळे त्याच्या जीवनात होणारी संक्रमणे, ऊस, ऊसाची लावणी,

तोडणी अशा अनेक प्रसंगामधून फुलतं जाणारे शेतकरी जीवन आपल्याला 'गावठाण' मधून दिसून येते.

**'गावठाण' मधील दिसणारा सावकारीचा पाश :**

ग्रामीण भागात गोरगरीब शेतकऱ्यांची व शेतमजूरांची सावकारांकडून लुबाडणूक होण्याचे अनेक प्रसंग घडत असतात. हे सावकार गोरगरीब व असह्य लोकांना अनेक प्रसंगामध्ये अडकवून त्यांची लुटमार करतात. अगतिक शेतकरी त्या सर्व गोष्टींना बळी पडतात. हे सावकार लोक सर्व लोकांना नाडतात व त्याचा फायदा घेताना दिसून येतात. या सावकारी पाशाचे ह्दयस्पर्शी असे चित्रण आपल्याला गावठाण मधून झाल्याचे दिसून येते.

गावठाणची नायिका आंदी ही आपल्या लहाणपणामध्ये गुर-ढोरं राखायचं काम करीत असते. ही गुरढोरं माळावर घेऊन गेल्यावर ती कधी कधी गावातील धनदांडग्या नारुआबाच्या शिवारात तर कधी साऊबाच्या ऊसात उतरायची. तेव्हा ही दोघंही संपूर्ण गावाची आयभणं काढायला मागेपुढे पाहत नसतं. कुणाबरोबरही भांडण उकरुन काढत. ह्यांच्या नादाला कोणं लागत नाही. म्हणूनच नारूआबाच्या शिवारात गेलेल्या म्हशीला आंदी म्हणते, "आगऽऽ वरडू नगस... कुणीतरी बघीटल तर नारूआबा झगा फेडील माझा."[१८] अशा नारुआबाबद्दल आंदी पुढं म्हणते, "नारुआबाचा गावात लय धाक हुता. गरीबांच्या आईभनी दारात हुबा ऱ्हाऊन काढायला. त्येच्या तोंडाला कोण लागत न्हवत. त्येच रानं गावात लय हुतं."[१९] अशा नारुआबाच आणि आंदीच्या दादांच त्यांच्या शेतात गेलेल्या ढोरांवरून भांडण होतं तेव्हा नारुआबा गल्लीत उभा राहून म्हणाला, "कोंड्याऽऽ, लय बोललास, तुझ्याभनं, तुझी ढोर कुठं जात्यात ते बघतोय. नि गावाच्या बी आईला भंगी लावला न्हाई तर इचार."[२०] अशाच पद्धतीने साऊबाही कादंबरीत येताना दिसतो.

कादंबरीतील अशा अनेक प्रसंगावरून सावकारीचा पाश आपल्या लक्षात येतो. आंदीच लग्न ठरविल्यानंतर आंदीचे आई-दादा रेडा विकून, कर्ज काढून पैसा उभा

करतात. तरीही तो पुरत नाही. शेवटी धारंच्या भांड्याचा प्रश्न तेवढा सोडवं, म्हैस विकली असती पण तिला सहावा महिना असल्याने कोण घेणार आहे. हे असं म्हटल्याबरोबर रामादा म्हणाला, ''हे बघ कोंड्यादा, म्हसीला साव्वा महिना न्हवं. मघ मी घेतो, काय द्याच सांग.''[२१] अशाप्रकारे अनेक शेतकऱ्यांची अगतिकता पाहून सावकार त्यांना नाडतात. या म्हैशीबद्दल दादा म्हणतांत, ''भांड्याकडं जीव भांड्यात पडला. खरं म्हसीकडनं अडकला.''[२२] अशा अनेक प्रसंगातून आपल्याला सावकारीच प्रत्ययकारी दर्शन होतं.

अशाच एका प्रसंगात आंदीच्या सासरच्या गावाचा दसरू पाटील हा सावकार. त्याच्या व आंदीच्या म्हैशींची झुंज लावल्यावर आंदीच्या गाभण्या म्हैशीच्या डोक्यावर दगड मारतो. म्हैस मरते पण तो इतरांना म्हैस झुंजीत मेली असचं लबाड सांगतो. आंदीची त्याला विरोध करण्याची तागद नसते. तेव्हा आंदी अगतिक होऊन म्हणते, ''दसरू पाटील लबाड बोलला हेच लय वाईट वाटलं-गड्यासारखा गडी, गावात वतन माईना. तेनं माझ्या म्हसीसाठी लबाड बोलायचं?''[२३] अशा पद्धतीने अनेक प्रकारे हे सावकार लोक गोरगरीब लोकांना छळताना व लुबाडताना दिसतात.

## 'गावठाण' मधील अंधश्रद्धा:

ग्रामीण भागातून दिसून येणाऱ्या अंधश्रद्धेचे दर्शन आपल्याला 'गावठाण' मधील अनेक प्रसंगातून घडते. ग्रामीण समाजातील गोरगरीब माणसं अशिक्षित असतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये आपल्याला अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा दिसून येतात. अशाप्रकारच्या अंधश्रद्धा 'आंदी' च्या जीवनातही घडताना दिसतात. त्यामध्ये लहानपणी आंदी गुरे घेऊन गेली असता तिचा पाय मुरगळतो व सुजतो, खूप दुखतो, तिला चालताही येत नाही. तेव्हा दहा पंधरा वर्षापूर्वी विहिरीत जन्म दिलेल्या बनीवर शंका घेऊन आंदीची आई म्हणते, ''आगं आज आमुस्या, त्या बनीन तुला सोडली कशी?''... तिला म्हार लागला त्यो! माझीच पोर घावली व्हय!''[२४] असं म्हणून तिची आई सोनीदेववालीला विचारायला जाते. तेव्हा सोनीदेववाली आईला म्हणते, ''सात दाण्यांची धामटी आईतवारी टाक, घरात तिच्यावरनं

काळ पिल्लं उतरून ठेव, मुठबर तांदूळ नि अंगारा फडक्यात बांधून ठेव, पिल्लं मोठं झालं की जत्रा कर.''[२५] या पद्धतीने आई सर्व गोष्टी करते. पिल्लं मोठं झाल्यावर जत्रा करण्याबद्दल ती पुन्हा सोनीदेववालीला विचारते तेव्हा ती म्हणते, ''लवकर भागवून टाक मला लय तरास हुतोय,''[२६] ह्या अशा प्रसंगामधून आपल्याला अंधश्रद्धेचे दर्शन होते.

अशाच पद्धतीने अनेक गोष्टीमधून आपल्याला अंधश्रद्धेचा प्रत्यय येतो. संपूर्ण ग्रामीण समाज हा अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकल्याचे आपणास दिसून येते. आंदीच्या जीवनातही पुढे जेव्हा तिच्या नवऱ्याला असाध्य रोग होतो. तेव्हा आंदी सर्व औषोधोपचार करते. पण काहीही फरक पडत नाही. तेव्हा आंदीचे आई–दादा देवाधर्माच्या पाठीमागे लागतात. एकही देवऋषी ठेवत नाहीत. शेवटी आई आंदीला तिच्या भावाकडून सांगावा देते, '' त्येच्यावं करनी केलीया कोकणाततली देवी हाय. तिकड जाऊन फोड करून आल्या बिगर कळणार न्हाई.''[२७] आणि त्याप्रमाणे ती सर्व गोष्टी करताना दिसून येतात. अशाप्रकारे माणसांच्या अगतिकतेतून अंधश्रद्धेचे दर्शन झाल्याचे आपणास दिसून येते. अशाप्रकारची अंधश्रद्धा ग्रामीण भागामध्ये आपल्याला ठायी ठायी दिसून येते.

त्याचपद्धतीने आणखी एका प्रसंगातून आपल्याला गावठाणमधील अंधश्रद्धा प्रत्ययास येते. आंदीचा नवरा मेल्यानंतर तिचा दादा तिला गाभणं म्हैस देतो. ती व्यायल्यावर कितीही प्रयत्न केले तरी ती कासेत हातच घालू देत नाही. तेव्हा आंदी वैतागते व तिच्यावरणं बिबा, लिंबू, मिरच्या उतरून तिकाटण्यावर ठेवते. तरीही फरक पडेना तेव्हा ती गुरवाच्या बाईकडे जाते तिच्याकडे साती आसराचं देवस्थान असते ती आंदीला 'भंडारा' देते आणि म्हणते, ''ह्यो भंडारा तिच्या भरड्यातनं घाल नि वाईच फूक, आईतवारी कडूस पडल्यावर तळ्याच्या काठाला दहीभात ठेव.''[२८] अशाप्रकारची वेगवेगळ्या पद्धतीची अंधश्रद्धा ग्रामीण भागामध्ये आपल्याला दिसून येते. ती प्रातिनिधिक स्वरूपात 'गावठाण' मध्ये आली आहे.

## 'गावठाण' मधील श्रद्धायुक्त भोळ्या समजुती :

खेडेगावातील माणसाचं जीवन हे पूर्णपणे निसर्गाधिन असते. ऊन, वारा, पाऊस यांचा त्यांच्या जीवनावर खोल परिणाम होत असतो. त्याची कृषिनिष्ठ जीवनशैली संपूर्णपणे निसर्गावर अवलंबून असते. निसर्ग हा पूर्णपणे लहरी असतो. म्हणूनच शेतकरी हा निसर्गाला देवत्त्व देतो. यामधूनच त्याच्या अनेक श्रद्धा व समजूती झालेल्या असतात. त्या श्रद्धांचा व समजूतींचा आधार घेऊनच तो आपले जीवन व्यतीत करीत असतो.

अशाप्रकारच्या अनेक श्रद्धांचे व समजूतींचे प्रत्ययकारी चित्रण आपल्याला गावठाण मधून झाल्याचे जाणवते, गावठाण मध्ये पानोपानी श्रद्धेची, भोळ्या समजूतीची अनेक उदाहरणे प्रत्ययास येतात. ग्रामीण माणसाचं जीवन हे अशाच अनेक भोळ्या श्रद्धांशी निगडीत असते. त्यांच्या जीवनात अनेक श्रद्धा स्थाने असतात की त्यांच्यावर श्रद्धा ठेवूनच ती सर्व व्यवहार करताना दिसतात.

कृष्णात खोतांच्या 'गावठाण' कादंबरीची सुरवात, ''तांबुजाईला नारूळ दिला तवा कुटं ढोरांच्या अंगावरल्या तांबवा गेल्याता.''[२९] अशीच आहे. ग्रामीण भागामध्ये गावची पांढर, तांबुजाई, वाघुजाई, विठ्ठलाई अशी श्रद्धा स्थाने असतात. या श्रद्धा स्थानांवर संपूर्ण गावगाडाच चालत असतो. शेतकऱ्यांच्या जीवनात कोणतीही संकटे आली किंवा काही सुखदु:खाचे प्रसंग आले तरी तो या श्रद्धा स्थानाजवळ शरण येत असतो. त्यातूनच प्रत्येक वर्षी या देवीच्या जत्रा, ऊरूस भरवले जातात. त्यांना बकरी, कोंबडी बळी दिले जातात. गावाचं रक्षण कर असे कौल घेतले जातात. नारळ दिले जातात. शेतीच्या कोणत्याही कामाची सुरवात करताना, कोणतेही धार्मिक विधि करताना प्रथम या श्रद्धास्थानांचे आशीर्वाद घेतले जातात. व नंतरच इतर गोष्टींची सुरवात होते. श्रद्धांमधूनच ग्रामीण माणसांच्या अनेक भोळ्या समजूती निर्माण होत असतात. असे अनेक प्रसंग कृष्णात खोतांनी आपल्या कादंबरीमध्ये रेखाटल्याचे आपणास दिसून येतात.

गुरं राखणारी कादंबरीची नायिका आंदी म्हणते, ''माळावरच्या साऱ्या गुराढोरास्नी तांबुजाई सांभाळतीया. दर वर्साला तिला योक नारळ दिला म्हंजी धगधग ऱ्हाय.''[३०] ती पुढे म्हणते, ''नारूळ दिला नि आमी सगळ्यांनी, ढोरागुरास्नी, माळावरच्या पोरास्नी सुखी ठेव,' म्हणून कवल घेटला.''[३१] अशा पद्धतीची भोळी श्रद्धा आपल्याला ग्रामीण भागात पदोपदी आढळून येते. गुराढोरांच्या सांभाळ करणाऱ्या तांबुजाईबद्दल आंदी म्हणते, ''गावातल व्हॉर लंगडाय लागलं, आज्यारी आसलं, तरी आम्ही सारी तांबुजाईच्या म्होरची माती ढोरांच्या कपाळाव लावतोय.. म्हंजी गावातल्या ढोरागुरावरती या तांबुजाईचाच साऱ्यापरास लय हाक्क हाय.''[३२] त्याचबरोबर संध्याकाळी हुंबऱ्यांना विभुती लावणे, एखादं नवीन जनावर घरी आणल्यावर त्याला भाकरीचा तुकडा तोंडात देणे, त्याच्या पायावर पाणी घालणे, भाताचा मुटका अंगावरून ओवाळून टाकणे, त्या जनावराने उजवा पाय घरात टाकणे, म्हैसीला किंवा गायीला गाब जाण्यासाठी तांबुजाई, वाघुजाई इ. ग्रामदेवतांना नवस करणे अशा श्रद्धा युक्त गोष्टी 'गावठाण' मध्ये घडताना आपल्याला दिसतात.

त्याचबरोबर एखाद्या लहान मुलाचा दात पडल्यावर तो पुन्हा येण्यासाठी गरवार बाईच्या घरावर टाकणे, म्हैस किंवा गाय गाब गेल्यानंतर ती वाघुजाईची, तांबुजाईची कृपा म्हणणे, गायीला देव मानने, तिच्या पोटात तेहतीस कोटी देव मानने, शेतात कोणतेही काम करताना सुरवातीला नारळ देणे इ. गोष्टी घडतात. भाताची मळणी झाल्यावर भाताची रास भरण्याअगोदर आंदीची आई आंदीला म्हणाली, ''पोरे, घरातनं गूळ, उदकाडी, पाण्याचा तांब्या, दहीभात घेऊन येजा.''[३३] तसेच आंदीची गुरं जेव्हा साऊबाच्या ऊसात जातात तेव्हा साऊबा पासून सुटका होण्यासाठी आंदी म्हणते, ''काठी खाली ठेवली, तिथलिच माती कपाळाला लावली, आई वागुबाई, साऊबा नसावा गं बाई!''[३४] आंदीच्या या कृतितून तिची वाघुजाईवरील अपार श्रद्धा आपल्या लक्षात येते.

अशा या आंदीच लग्न ठरल्यानंतर भरल्या चुड्यांन आंदी तांबुजाईला जाऊन नमस्कार करते. दोन मुली झाल्यानंतर मुलगा नाही म्हणून सारसरच्या माणसांकडून त्रास सुरु होतो. तेव्हा तिसऱ्यांदा दिवस गेल्यानंतर आंदी म्हणते, ''चुलीतली राख घेटली

तिथनच गावाकडच्या देवाला फुकली, आई, आताच्या खेपला पोरगाच झाला पाहिजे. तरच तुझ्याकडं यील न्हायतर न्हाई.. देवाला नवस केलच हुतं तिच्या ठाण्याला जाऊनच बसल्यालं बर, वाघुजाईला बकरं कापल्याबिगर न्हायचं न्हाई. पोरगाच हुनार. त्याबिगार जगायच बी न्हाय.''[३५] या अशा प्रसंगातून तसेच मुलगा झाल्यानंतर आंदी म्हणते, ''आईनं नारळाचं तोराण वाघुजाईला बांधल, देवांन बघीटलं माझ्याकडे–माझी वाघुजाईच नवसाला पावली.''[३६] आंदीच्या या विचारातून तिची भोळी श्रद्धाच आपल्या लक्षात येते.

आंदीचा नवरा खूप आजारी पडतो तेव्हा आंदी म्हणते, ''आई वाघुजाई, माझ्या बापयाला काम धंदा न्हाई हुंदे, पर कुकू–माझं धड न्हाऊ दे.''[३७] तसेच डवरीबाई म्हणते, ''हे बघ ज्यानं जल्म दिलाय त्येला काळजी हाय. त्यो उगच वर बसल्याला न्हाई जग चालवाय तू आपला धीर धर,.''[३८] यामधून आपल्याला भोळी श्रद्धाच दिसून येते. वाघुजाईला गेल्यानंतर आंदी नाक घासून वाघुजाईला सांगते, ''म्होरच्या म्हैन्यात तुझं द्याचं हाय ते देतो. तुझ्या पोरीच्या बापयाला तूच सांभाळ, तिचं कंकू तूच सांभाळ.''[३९] या अशा अनेक प्रसंगामधून ग्रामीण माणसांची देवावरची, निसर्गावरची श्रद्धा व त्या श्रद्धेतून त्यांच्या भोळ्या मनाच्या झालेल्या समजूतींचे प्रत्ययकारी चित्रण झाल्याचे आपणास दिसनू येते.

## 'गावठाण' मधील लहरी निसर्ग :

ग्रामीण समाज निसर्गाचं लहरीपण जाणूनच त्याला देव मानतो व त्याची पूजा करतो. तरीही हा निसर्ग लहरी वागून शेतकऱ्याच्या जीवाचे हाल करतो. प्रसंगी त्याच्या डोळ्यात पाणी आणतो असे काही प्रसंग 'गावठाण' कादंबरीत चित्रित झाल्याचे आपणास दिसून येतात.

मळणीच्या दिवसात पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्याचे प्रचंड हाल होतात. अशाच पद्धतीने एकदा आंदीची मळणी पावसाच्या गडबडीत होते. अशावेळी माणसांना दोन वेळचं जेवणही नीट मिळत नाही. आंदीची मळणी झाली आणि पाऊस उघडल्यामुळे

गोंदूआबाची मळणी घातली. मळणी थोडी होतेय की नाही तोपर्यंत पावसाची सुरवात झाली. याबद्दल आंदी म्हणते, ''पाऊस पडत हुंता...गडी भिजल्यालं पिंजार काढीत हुंत, झिंज्या गळाय लागल्या.. कोण कुणासंग बोलतं नव्हतं. तेवढ्यात मोठा पाऊस आला, काय चालना, सारी जण पळतं खोपीत आली, गोंदूआबा खोपीच्या दारात गप्पगार हुबा हुता.''[४०] पावसात मळणी भिजल्यावर गोंदूआबा म्हणला, ''कोंडुदाऽऽ वरीसच्या वरीस पाण्यात गेलं.. गोंदूआबा असे म्हणला नि त्येला हुंदकाच फुटला. त्यो पोरागत रडाय लागला.''[४१] अशा प्रसंगातून निसर्गाच्या लहरीपणाचा व शेतकऱ्यांच्या अगतिकतेचा प्रत्यय येतो. भाताच्या सुगीत तर सुगी संपेपर्यंत ह्या निसर्गाच्या लहरीपणाशी शेतकऱ्याला पाठशिवणीचा खेळ करावा लागतो.

उन्हाळ्याच्या दिवसात गुराढोरांना, मुलामाणसांना, पावसाची खूप आवश्यकता असते. पण अशावेळी तो पडतच नाही. त्याबद्दल आंदी म्हणते, ''वळवाचा एकादा बाबा ढासळला असता म्हंजी ढोरास्नी, माणसांस्नी बरं झालं असतं.''[४२] यामधूनच निसर्गाचा लहरीपणा आपल्या लक्षात येतो. निसर्गाच्या या वेळी अवेळीपणाचा खूपच फटका ग्रामीण लोकांना सहन करावा लागतो.

### 'गावठाण' मधील रूढी, प्रथा, परंपरा :

ग्रामीण समाज हा श्रद्धा–अंधश्रद्धेबरोबरच रूढी–प्रथा व परंपरेचा पूजक असतो. त्यानं आपल्या स्वतःच्या जीवनशैलीलाच अनेक रूढी, प्रथा, परंपरांनी बंदीस्त केलेले असते. या रूढीप्रथा परंपरेनुसार त्याच रोजचं जगणं, वागणं, राहणं चाललेलं आपल्याला दिसून येते. एकंदरीत ग्रामीण भागाचा गावगाडाच या रूढी, प्रथा, परंपरेवर आधारलेला असतो. ग्रामीण समाज हा आपल्याला अनेक बंधनामध्ये बांधून जगताना दिसतो. नीतीतत्त्वाना कोणत्याही प्रकारे तडा जाऊ नये म्हणून अनेक रूढी, प्रथा, परंपरेच यथार्थ दर्शन आपल्यालाा 'गावठाण' मधून घडतं.

रूढी, प्रथा, परंपरेतूनच ग्रामीण समाजाची एक विशिष्ट अशी श्रद्धा निर्माण झालेली असते. त्या श्रद्धेतूनच तो असणाऱ्या ग्रामदेवतांना उदा. पांढरी, वाघुजाई, तांबुजाई, विठ्ठलाई यांना शरण जातो. ठराविक रूढी, प्रथा, परंपरांनुसार तो त्यांची पूजा, अर्चा, यात्रा, उत्सव करताना दिसून येतो, तांबुजाईंला, वाघुजाईला नारळ हा परंपरेनुसार दिला जातो. सण-उत्सवामध्ये घरे-दारे ही परंपरेनुसार स्वच्छ केली जातात. दसऱ्याच्या सणात माणसं नवरात्र बसतात. आंदीची आईही नवरात्र बसते तेव्हा आंदी म्हणते, "घट बसलतं, दसऱ्याला नवरातन बसायला पोटासाठी लाम लाम गेल्याली माणसं दरवर्सप्रमाणं आली. आई बी नवरातन बसली हुती."[४३] या सर्व गोष्टी प्रथेतून घडताना दिसतात.

ग्रामीण भागामध्ये सर्व सणांना उत्सवांना एक परंपरा असते. त्याच पद्धतीने अनेक धार्मिक विधिही रूढीने होत असतात. त्यामध्ये लग्न, बारसं, मर्तीक ह्या सर्व गोष्टी रूढीने, प्रथेने होत असतात. इतकेच काय तर अंगावर कोणते कपडे घालायचे, दागिणे कोणते घालायचे, हे ही परंपरेने चालत आलेले असते. म्हणून सखीचे लग्न ठरविण्यासाठी आलेल्या सासूचे वर्णन करताना आंदी म्हणते, "तिच्या गळ्यात चिताक, माळ, हातात पाटल्या, कानात फुलं, असं बरचं दागिण हुंत. बाई काळीसावळीच हुती. खरं दागिन्यानं सजविल्याला म्हसीगत दिसत हुती."[४४] या अलंकारातूनही एक परंपरा आपल्याला दिसते. लग्नामध्ये घ्यावयाचे कपडे, दागिणे, बोलाचाली, साखरपुडा, घर बघणे, धार घालणे ह्या सर्व गोष्टी रूढी, प्रथा, परंपरेनुसार घडत असतात.

आंदीच्या लग्नात परंपरेनुसार बैलगाड्या सजविलेल्या आहेत. बैलाच्या अंगावरती झुली घातलेल्या आहेत, गळ्यात चाळ बांधलेला आहे. शिंगांना काळा दोरा, लिंबू बांधलेला आहे. तसेच गाड्यांना कमानी केल्या, त्याचबरोबर हालगीचा खेळ घेतला. या सर्व गोष्टीतून आपल्याला पारंपरिकता दिसून येते. तसेच लग्नाचा रूखवत, हळद, बाशींगे, जानवसा ह्या सर्व गोष्टी आपल्या रूढीने व प्रथेने होताना दिसून येतात. तसेच येणारे सण, गौरीगणपतीच्या सणाला सर्व माघारणी परत येऊन परंपरेनुसारच झिम्मा, फुगडी ह्यासारखे खेळ खेळतात.

**'गावठाण' मधील संक्रमण अवस्था :**

१९७० नंतर ग्रामीण साहित्याची चळवळ खऱ्या अर्थाने सुरू झाली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातील खेड्यापाड्यात अनेक भौतिक सुविधा पोहचू लागल्या. शिक्षणामुळे माणसांमध्ये ज्ञान आलं तरी काही माणसं ज्ञानाचा फायदा अनीतीसाठी करू लागली. यातूनच सर्वसामान्य गोरगरीब जनतेची होरपळ सुरू झाली. आधुनिकीकरणामुळे बलुतेदारी व अलुतेदारी पद्धती कोलमडून पडली. संपूर्ण गावगाडाच उदध्वस्त व्हायला सुरवात झाली. यासर्व गोष्टींचे पडसाद साहित्यात उमटू लागले. ह्या आधुनिकीकरणाच्या संक्रमणतेचे चित्रण आनंद यादवांच्या 'गोतावळा' कांदबरीत अतिशय ह्दयस्पर्शी अशा स्वरूपाचे झाले आहे.

त्याचपद्धतीने ही संक्रमणावस्था कृष्णात खोतांच्या 'गावठाण' मधून प्रकट होताना दिसते. आधुनिकीकरणामुळे गावठाण मधूनही शेती ही ट्रॅक्टरने केल्याचे व पंपाने शेतीला पाणी दिल्याचे दिसून येते. असे असले तरी कादंबरीची नायिका आंदी जेव्हा लग्नाला येते तेव्हा पैशासाठी तिच्या आई-वडीलांना घरचा रेडा विकावा लागतो. त्याच्यापाठीमागेही आधुनिकीकरणाची संक्रमणावस्था आहे. आंदीच्या आई-वडीलांची उपजिविका ही बऱ्यापैकी त्या रेड्यावरच अवलंबून असते. तो रेडा त्यांनी म्हैसींना गाब घालवण्यासाठी पाळलेला असतो. त्यामुळे त्यांना खूप गिऱ्हाईक असायचं. पण जेव्हा गडावर जनावरांचा चांगला डॉक्टर येतो आणि तो आधुनिक पद्धतीने नळी घालून ढोरास्नी गाब घालवाय लागतो, तेव्हा रेड्याचं गिऱ्हाईक कमी होते. त्यातूनच आंदीच लग्न ठरतं आणि पैशाची परवड म्हणून रेडा विकावा लागतो. तेव्हा दादा म्हणतात, ''पोरगीच लगीन नसतं नि डॉक्टर बी आला नसता तर काय इकला असता काय त्येला?''.. तर आई म्हणते, ''त्येचं दार लागलं त्येच. कुठणं उगावला भाड्या नि दावणीच दाव पडलं.''[४५] रेडा विकल्यानंतर त्या कुटूंबाच्या मनाची अनेक मानसिक आंदोलन होतात. त्यांना खूप वाईट वाटतं. त्याबद्दल आंदी म्हणते, ''सारं घर माणूस मेल्यागत झालं हुंत, साऱ्यांनी निवद शिवल्यागतं

जेवाणं केलं. दादा छपरात गेलचं न्हाईत. त्ये भेगाळल्याल्या जमीनीगत दिसत हुतं.. आई हुरदं फाटल्यागत बोलत हुती. दादा आबाळ वतल्यागत रडतं हुतं. माझ्या मनाचं कोपरं खुरप्यानं कापल्यागत झालं हुतं.''[४६] आंदीचे व तिच्या कुटूंबाचे हे दु:ख आधुनिकिकरणामुळे झालेल्या संक्रमणावस्थेचेच प्रतिक आहे.

## माणसांमाणसातील कमालीचे प्रेम :

गावठाण वाचत असताना त्यामध्ये आपल्याला काही जिव्हाळ्याची नाती, मैत्री दिसून येते. त्या माणसांमध्ये असणाऱ्या कमालीच्या प्रेमाचा प्रत्यय येतो. गावठाणची नायिका आंदी हिच्याभोवती ही कादंबरी फिरताना आपल्याला दिसून येते. आंदीच्या जीवनात येणाऱ्या काही माणसांमध्ये आपल्याला कमालीची प्रेमभावना दिसून येते. त्यामध्ये तिचे आई–वडील, आण्णा, गोंदूआबा, तिच्या मैत्रिणी रंगी, सखी, तिचा नवरा, तिच्या दोन मुली, मुलगा, तिच्या नवऱ्याचे दोस्त रामादा आणि नामू दाजी त्यांच्या बायका, गणपूदा, म्हातारी इत्यादी माणसांमधून दिसणारे कमालीचे प्रेम आपल्याला जाणवू लागते. काहीवेळा रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीची व ओळखीची नाती श्रेष्ठ ठरतात व रक्ताच्या नात्यातील प्रेमाला मर्यादा पडते. या कादंबरीमध्ये वरील सर्व व्यक्तीमध्ये कमालीचे प्रेम दिसून येते आणि माणसानं माणसावर कशा पद्धतीने प्रेम करावे याचा प्रत्यय येतो.

या कादंबरीत आंदीच्या आई व दादांचे एकमेकांवर असणारं प्रेमही उत्कट स्वरूपाच आहे. या दोघांचीही अतिशय लाडकी अशी आंदी आहे. आंदीच्या जीवनातील दु:खं कमी व्हावी म्हणून ती आपल्या जीवाच रान करतात व तिच्यासाठी आपल सर्वस्व दयायला तयार होतात. ज्याप्रमाणे आई –दादांचे आंदीवर निरागस प्रेम आहे. त्याच पद्धतीचे प्रेम आंदीचे आपल्या आई–दादावर आहे. ज्यावेळी गुराकडे गेलेल्या आंदीला काटा लागतो. तेव्हा तिच्या आई–दादांचा जीव तिळतिळ तुटतो. तिची आई सोनीदेववालीला विचारून ती सांगते ते सर्व काही आंदीसाठी करते. तसेच आंदीचे आईवडील आणि गोंदूआबा यांच्यातील जिव्हाळ्याचे संबंध आपल्याला दिसतात.

एकमेकांसाठी रात्रभर राबणारी अशी त्यांची सलगी आहे. त्याचबरोबर आंदीच्या बालपणीच्या मैत्रीणी सखी आणि रंगी यांच्यातील प्रेम हे उच्च कोटीचे असे आहे. निरागस मनातून जडलेली मैत्री त्यांनी अखेरपर्यंत टिकवली. ज्यावेळी सखीचे लग्न ठरते व ती सासरी जाते त्यावेळी आंदीची व रंगीची झालेली मनाची व्याकुळ अवस्था ह्दयात कालवाकालव करणारी अशीच आहे. तिच्या लग्नानंतर आंदी म्हणते, ''माळावर आलो, रंगी नि मी, कसंकसंच वाटत हुतं... सखी जिवाची सखी हुती. सखी नि मी एका येरल्यात, एका दगडावर, एका जाळीच्या सावलीला बसत होतो. माझ्या पायात काटा लागला तर तिला कळ यीत हुती. तिच्या पायात लागला तर मला... सखीच्या आठवणीचे पाणी डोळ्यातून खाली गळतं हुतं. रंगी अर्ध बोलून माटकन खाली बसली, भदाभदा रडायला लागली,''[४७] यावरून त्यांच्या नात्यातील निरागस प्रेम आपल्या लक्षात येते.

अशा या आंदीच जेव्हा लग्न होतं तेव्हा आईदादांना खूपच भडभडून येत. सासरी गेल्यावर आंदीला घरची खूप आठवण येते. तेव्हा आंदीची सासू म्हणते इथं काय माणसं नाहीत. तेव्हा आंदी म्हणते, ''खरं हाय, माणसात आई न्हवती, दादा न्हवतं, आण्णा न्हवता, गोट्यात ढोरंबी दिसत हुती.... सगळ हाय खरं नसल्यागत हाय. साऱ्यांस्नी बघीटल की भडभडून यायचं. डोळ्यातलं पाणी अंधारातच वाट चाचपडत बसायच.''[४८] यातून आपल्याला कमालीच्या प्रेमाचा प्रत्यय येतो. आंदीच्या नवऱ्याला खूप मोठा आजार होतो. तेव्हा तिच्या नवऱ्याच्या मित्रांनी दिलेली सोबत, केलेले सहकार्य हे त्यांच्यातील कमालीचे प्रेम दाखविते. त्याचा रामा दोस्त त्याच्यासाठी आपली शेरडी आणून घालवितो आणि वरती दोस्तासाठी शंभर रूपये देऊन जातो. आणि कवाबी नड लागली तर इत जा असं सांगून जातो. तेव्हा आंदीचा नवरा आंदीला म्हणतो, ''रक्ताचं कोण न्हवं बघ. जोडल्याली माणसच लय उपकार करत्यात.''[४९] यावरून त्यांचे संबंध कळतात.

पुढे जेव्हा आंदीला आंदीचे सासरचे खूप त्रास देवू लागतात. वेगवेगळे घाणेरडे आरोप करतात, आंदीला पूर्णपणे एकटी पाडतात तेव्हा आंदीच्या नवऱ्याला खूपच वाईट वाटते. त्याच्या डोळ्यातून पाणी येते. तेव्हा रामादा म्हणतो, ''गप्प बस माणसं फिरली मग

मी माणूस न्हवं? आरं सारी एक जातीची आणायची कुठली, कवा बी हाळी दे, ह्यो तुझा दोस्त एका पायावं येतोय.''[५०] अशा अनेक प्रसंगामधून गावठाण मधील चित्रित होणाऱ्या माणसामाणसामधील कमालीच्या प्रेमाचा आपल्याला प्रत्यय येतो व खऱ्या प्रेमाची रीत कळते.

## 'गावठाण' मधील कौटुंबिक संघर्ष :

ग्रामीण भागामध्ये दिसणारे कौटुंबिक संघर्ष आपल्याला गावठाणच्या रूपाने पहावयास मिळतात. एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये सर्वांच्या लग्नानंतर अनेक संघर्ष उद्‌भवतात त्यामधून कौटुंबिकतेचा ऱ्हास होतो व संघर्ष विकोपाला जातात. व ही नाती केवळ नावापुरती राहतात. गावठाणची नायिका आंदी हिच्या जीवनातही अनेक कौटुंबिक संघर्षांना सामोरे जावे लागते तरीही न डगमगता ती धैर्याने या सर्व गोष्टींना सामोरी जाते. लग्नानंतर आंदीला लागोपाठ दोन मुली होतात आणि तिथूनच कौटुंबिक संघर्षाला सुरवात होते. तरीही आंदी त्या गोष्टी सहन करते. पुढे आंदीला मुलगा होतो आणि इकडे नवऱ्याचे आजारपण वाढते. आजारपणामुळे औषधाचा खर्च खूप होवू लागतो. अशावेळी ज्या कुटुंबाला आंदीच्या नवऱ्यान पोसलं तेच कुटूंब त्याचा तिरस्कार करू लागलं. त्याला वेगळ पाडू लागलं. त्यातूनच त्यांचे कौटुंबिक संघर्ष पेटल्याचे आपणास दिसून येते.

दोन मुली झाल्यामुळे आंदीच्या जावा म्हणायच्या, ''आम्हासी एक पोरगी नि हिला दोन. पोरी दयायच्या कशानं? त्येंचे उसंपायसं बघायचं कुणी? घरबुडवी.''[५१] हे सार आंदी सहन करायची. खरं एक दिवस हा संघर्ष विकोपाला गेला व घराची वाटणी झाली. नवऱ्याची आई म्हणाली, ''हे बघ पोरास्नी घ्या नि त्या मागच्या खोलीत ऱ्हावा. माझ्या पोराला तू पैशाला महाग केलस. घरात इख खायला पैसा नाही.''[५२] आंदीच्या जावा तिच्या नवऱ्यापुढे माना वर करत नव्हत्या. खरं आज चवड्यावर उभं राहून बोलत हुत्या. एका दिवसात सार होत्याच न्हवतं झालं. आंदीचा नवराही चिडतो आणि म्हणतो, ''आग जा की, तुझ्या आयला तुझ्या. तू बी माझा अंत बघतीस व्हय.? त्यांस्नी आपण आता नको

झालोय.''[५३] एकत्र राहणार कुटूंब वेगळं झाल्यावर नेहमीच संघर्ष उद्‌भवतात. कालची जीवाभावाची नाती एका दिवसात परकी होतात. नवऱ्याच्या आजारपणामुळे दारिद्रयात पिचणारी आंदी म्हणते, ''सवतं ऱ्हायील्यापासून ह्येंनी एका सबदानं तरी इच्यारावं, जितं हायसा का मेलाय म्हणून. पोरं माझी भाकरी भाकरी करून निजलित. खरं आतनं एकाद्याची बी छाती झाली नाय कोरभर भाकरी द्यायची.'[५४] यातून आपल्याला पराकोटीच्या संघर्षाची कल्पना येते.

जावांची लहान मुले जेव्हा आंदीच्या मुलाला हिनवतात तेव्हा आंदी रागाने त्यांना शिव्या घालते. तेव्हा पदर खवून सतत भांडायला तयार असणारी थोरली जाऊ बोलली, ''ये बाई, पोराढोरांस्नी काय सांगून आयकतं. बघ ऱ्हायीतर आमास्नी काढं घरातनं बाहिर. घरात दुखणकरी हाय, जरा त्याला शांताई दे, पोरांनी पोरात याच ऱ्हाई तर कुणी? तेव्हा आंदी म्हणते, ''कोण शांताई देतयं, कुणी दिली. त्ये देवाला ठाव. तू माप रिकामी हायसं पदर कवून.''[५५] यामधून आपल्याला आंदीच्या जीवनातील संघर्षातून निर्माण होणारी तिच्या मनाची आगतिकता अनुभवास येते. आजारपणाने व घरातील माणसाच्या बोलण्याने आंदीचा नवरा दु:खी होतो. तेव्हा आंदी म्हणते, ''अवं, माप माणसं हायतं, दुनिया भरलीया, का वस पडलीया व्हय? ऱ्हाई बोलु द्यात घरातली.''[५६] अशा अनेक घटनांमधून आपल्याला गावठाण मधील संघर्षाचे दर्शन होते.

आंदीचा नवरा वारल्यानंतरही तिच्या सासरची मंडळी तिची पाठ सोडत नाहीत. आंदीचा सासरा जेव्हा तिला इथच रहा म्हणतो तेव्हा तिच्या जावा म्हणतात, ''कशाला ह्यो म्हातारा वढून धरतोय? रांड मुंड बाई रोज उठून त्वांड बघायचं, तिकडचं टळली तर बर हुईल.''[५७] अशाप्रकारे पदोपदी गावठाण मधील कौटुंबिक संघर्ष आपल्याला दिसून येतो.

**रक्ताच्या नात्यातील तुटलेपण:**

गावठाण मधून आपल्याला माणसामाणसातील कमालीचे प्रेम जरी प्रत्ययास आले तरी त्या ठिकाणी आपल्याला प्रचंड मोठ्या प्रमाणात कौटुंबिक संघर्ष झाल्याचे दिसून येते.

अगदी रक्ताची नाती ही संकटकाळात पाठ फिरवितात. आपणास एकाकी पाडतात. या सर्वांमधूनच आपणास रक्ताच्या नात्यातील तुटलेपण जाणवते. ज्या माणसासाठी व नात्यासाठी आंदीच्या नवऱ्याने आयुष्य झिजवले, ज्या कुटुंबासाठी त्यानं स्वत:च्या बायकोला कधी बायको म्हटलं नाही. घर शाबूत ठेवण्याचा प्रयत्न केला. त्याच कुटुंबाने आंदीच्या नवऱ्याच्या जीवनाची शोकांतिका केली. अशावेळी त्याचा संपूर्ण नात्यावरचा विश्वासच उडतो.

आंदीच कुटूंब वेगळ झाल्याझाल्यास त्यांच्यामध्ये प्रचंड कौटुंबिक संघर्ष होतात. एका क्षणात सारी नाती तुटतात. तेव्हा आंदी म्हणते, ''एका दिसात एवढ्या लाम माणसं जात्यात, आम्ही त्यास्नी नगंच हुतो. पोटच्या परास पाटचं उरावं म्हणत्यात. खरं त्यास्नी दया न्हाईच. त्यांच्यापायी मला बायकू म्हणून ह्येनी कवा मानानं बलिवलं न्हाई. मी त्येंच्या नावासाठी सोसलं. नि आज त्यांस्नीच ही कटाळलीत''[५८] तर तिचा नवरा म्हणतो, ''रक्ताचं कोण न्हवं बघ. जोडल्याली माणसचं लय उपकार करत्यात.''[५९] जेव्हा तिच्या नवऱ्याला तपासण्यासाठी कोल्हापूरला घेऊन जातात तेव्हा तिचा दीर गाडीत होता. पण तो एका शब्दानेही बोलला नाही. तेव्हा आंदी सांगते, ''संग असणारा थोरला दीर एक न्हाई का दोन न्हाई. सख्ख भाऊ नि जन्माच वैरी असल्यागतं. त्ये बी डोळं झाकून गप्प हुतंत.''[६०] आंदीचा नवरा मृत्यूच्या दारात असतानाही तिच्या सासरच्या घरातून कुणीही काहीही करत नाही तेव्हा आंदी म्हणते, ''एवढी कसली माणसं असतील ! का माणसाची जातच अशी उफराटी हाय?... जनावर माणसासाठी मरलं, खरं माणूस माणसाला मारील.''[६१] इतके पराकोटीचे नात्यातील तुटलेपण आपणास दिसून येते.

आंदीच्या नात्यातील माणसं तिला मदत करत नाहीत. ती नाहीतच वरून आणखीण जे लोक त्यांना मदत करतात त्यांनाही ते दोष देतात, नावे ठेवतात. आंदीच्या प्रसंगाला नामुदाजी जेव्हा मदत करायला यायचा तेव्हा तिच्या जावा म्हणायच्या, ''व्हय, उगंच त्येचं त्वांड जळलं त्ये. जेवलास का? बर वाटतय का? त्येला काय रातध्याड न्हाईच.''[६२] असे टोमणे मारायच्या. या नामूदाजीच्या पोरींच्या जीवनाची एक भयंकर परवड होते.

नवऱ्याकडची माणसं चांगली असतात परंतु तिचा नवराच भयंकर दारुडा असतो तो दारू पिऊन तिला मारत असतो. नामुदाजीची बायको आंदीला म्हणत होती, ''पोरीला सारखं त्यो मारतोय, रात्र–इरंच कवा बी येतोय. घरातनं बाहीर काढतोय. पोरीच्या जल्माच काय त्ये बाईला आई झाल्याबिगार कळत न्हाई.''[६३] अशाप्रकारे नात्यातील तुटलेपणाचं भयंकर वास्तव आपल्यासमोर उभं राहत.

आंदीच्या नवऱ्यावर कुणीतरी करणी केलेली आहे. असे एक देवऋषी त्यांना सांगतो तेव्हा ती गोष्ट मिटविण्यासाठी संपूर्ण भावकितले एकत्र येण्याची गरज असते. त्यासाठी सर्वजण एकत्र येऊन त्या देवीकडे जातातही पण पाठीमागे तिच्या जावा तिचा उद्धार करतात, शिव्या घालतात, पुढे एकदा आंदीच्या म्हैशीचे अंग बाहेर येते तेव्हा म्हैशीच्या पुढे खड्डा काढण्याची गरज असते. त्यावेळी घरी सासरा असतो पण येत नाही तेव्हा आंदी स्वतःच लोखंड हातात घेऊन खड्डा काढते. खरं सासऱ्याला त्याची दया येत नाही. तेव्हा आंदी म्हणते, ''त्याला कुठली दया? पोटच्या पोराला त्येनं बघिटलं न्हाई नि माझी दया कुठली यीतीया?''[६४] त्यानंतर जेव्हा आंदीची म्हैस व्याली तेव्हा दूध काढण्यासाठी आंदी एकटीच खटपट करते. तेव्हा शंकर आण्णा तिच्या सासऱ्याला ओरडतात. की, आरं ही बाई एकटी झटतीया, आरं पोरगा मेला तरी त्याची पोरं जिवंत आहेत. तुम्हाला एकाबी गड्याला लाज कशी वाटत नाही. तेव्हा सासरा म्हणतो, ''शंकरराव, ती म्हसं बरी, पाय बांधून दूधं तरी दिलं, खरं बाई म्हसीखाली घावली तरी घावलो म्हणायची न्हाई.''[६५] तेव्हा आंदीही रागानं म्हणते, ''पोरगा जित्ता हाय का मेला त्ये बघिटलं न्हाईसा नि त्याची पोर जित्ती हायतं का मेल्यात, काय बघताय?''[६६] अशा अनेक प्रसंगामधून आपल्याला नात्यातील तुटलेपणाचे ह्दयस्पर्शी दर्शन होते.

## शेतकऱ्याच्या शेतमालाची परवड :

शेतकरी हा शेतामध्ये वर्षवर्षभर रात्रंदिन राबत असतो व त्यातून तो पीके काढतो. त्या पिकांवरच त्याची गुजरानं होत असते. तरीही त्याच्या कष्टाचा विचार न करता त्याचा

शेतमाल हा बाजारामध्ये कवडी मोलानेही घेतला जात नाही. शेतकऱ्याच्या मालाची अगदी नगण्य किंमतीला लूट केली जाते. त्याच्या कोणत्याही मालास स्थिर भाव असा नसतोच. यामधून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत असतं. याचं वास्तव चित्रण आपल्याला गावठाण मधून होताना दिसून येते.

'गावठाण' मध्ये आंदीच कुटूंब हे शेतकरी आहे. त्यामुळे त्यांना पैशासाठी कधी आपली शेरडं, जनावरं विकावी लागतात. तर कधी धान्य विकावे लागते, पण त्याच्या मालाल योग्य असा भाव मिळतच नाही. कमी किंमतीत तो पाडून मागीतला जातो. मग आंदीच्या लग्नावेळी रामा सावकाराला दिलेली म्हसं असो किंवा खाटक्याला विकलेली पालवी असोत त्यांना योग्य असा भाव मिळाला नाहीच.

ज्यावेळी आंदीच्या नवऱ्याच्या औषधाला पैसे कमी पडतात, तेव्हा आंदी घरातील तांदूळ घेऊन बाजारात विकायला जाते पण बाजार तांदळांनी फुललेला असतो. त्यामुळे कवडीची किंमतही तांदळाला येत नाही व तांदूळ लुटून विकला जातो. त्यावेळी आंदी म्हणते, ''मंगळवारची गेलो कोतुलीच्या बाजारात तांदळाचं गठळ घेवून. बघतोय तर काय? बाजार सारा तांदळान ऊतू आलंता. गठळं ठेवलं, इचार करून काय उपयोग? गरजवंताला आक्कल नसते तशी गत माझी झालंती. लुटून इकलं तांदूळ, चार पैसे आले. थोडबुत कायबाय मीठ मिरचीचा बाजार केला नि आलो.''[६७] या पद्धतीने काही वेळा शेतमाल नगण्य किंमतीला विकला जातो व शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान होते.

**कमालीची सामूहिक भावना :**

ग्रामीण भाग हा सामूहिक जीवनपद्धतीतून आकाराला येतो. ग्रामीण भागामध्ये अनेक सण, उत्सव, विधी हे सामूहिकरित्या केले जातात. त्यामुळे ग्रामीण भागात सामूहिक मदतीची भावना वाढीस लागते. खेडे गावामध्ये एकाचे दु:ख हे सगळ्यांचे दु:ख म्हणून अख्खा गाव एकत्र येतो. अडिअडचणीच्यावेळी संपूर्ण गाव हे एक कुटूंब असल्यासारखं वावरंत. त्यातून एकमेकांना मदतीचा हात होत असतो. सुख-दु:ख, सण-समारंभ, धार्मिक

विधी यामध्ये सामूहिकता असते. त्याचपद्धतीने शेतीतील कामामध्येही सामूहिक भावनेतून एकमेकांना मदत करून शेती केली जाते. त्यातूनच ग्रामीण भागामध्ये एकसंघ अशी समूहभावना निर्माण होते.

'गावठाण' मध्येही अशा समूहभावनेचा आपणास प्रत्यय येतो. आंदीचे आई–वडील हे त्यांच्या गावाचा अविभाज्य भाग आहेत. त्यामुळे गावातील माणसांशी त्याचं सामूहिकतेचं नातं आहे. या नात्यातूनच काही माणसं त्यांना मदतीचा हात देताना दिसून येतात. सुरवातीलाच लहानपणी गुर–ढोरं राखणारी आंदी ही तिच्या रंगी व सखी या मैत्रिणीबरोबर माळावर जात असते. त्या तिघींमध्ये कमालीची सामूहिकभावना आहे. या तिघीही एकमेकींच्या सुख दु:खात सहभागी होतात. एकमेकींची गुरं राखतात, म्हणूनच सखीच लग्न झाल्यावर आंदीला व रंगीला सखीच्या वियोगाच खूपचं दु:ख होत. ते दु:ख मनाला बोचत राहतं. गावठाण मधून शेतीतील कामातील सामूहिकता आपल्याला दिसून येते. आंदीचा दादा आणि गोंदूआबा एकत्रीत मळणीचे काम करत होते. त्यांचा पैरा होता. एकमेकांच्या मळण्यांसाठी ते रात्रंदिन राबत असत. इतरही माणसं मदतीसाठी येत होती. ही सामूहिकता फक्त ग्रामीण भागातच असू शकते. गोंदूआबाची मळणी भिजल्यावर आंदीच्या दादास खूप वाईट वाटत. आंदीची आई पावसाबद्दल म्हणते, ''बिच्यान्या तासभर जरा थांबला असतास तर काय तुझ्या अंगाव फाळा आला असता.''[६८] भिजलेल्या अवस्थेत सर्वजण काम करतात. अशाच पद्धतीने अनेक गोष्टी समूह भावनेतून केल्या जातात. मग तो एकमेकांना मदतीचा हात असू दे, एखादी जत्रा किंवा परडी असू दे, सण, समारंभ असू दे किंवा विधी असू दे ह्या सर्व गोष्टी सामूहिक भावनेतून केल्या जातात. आंदी एके ठिकाणी म्हणते, ''पिंजराची व्हळी दादा दृष्ट काढून घ्यावी अशी रचत हुतं. सारं गाव व्हळी रचाय दादास्नी बलवायचं.''[६९] ही सर्व कामे सामूहिक भावनेतूनच केल्याचे आपणास दिसून येते.

'गावठाण' मध्ये माळाला आग लागल्यावर सार गावं आग विझवायला गेलं. सर्वांना त्या गोष्टीचं दु:ख होतं. तसेच सखीच्या लग्नाच्या प्रसंगी, तसेच आंदीच्याही लग्नाच्या प्रसंगी सारं गाव उभ होतं. ते अगदी साखरपुड्यापासून ते लग्नापर्यंत. इतकचं काय तर कडाक्याच

भांडण केलेला नारू आबा ही समूहभावनेतून लग्नाला येतो. तेव्हा आंदी म्हणते, "लग्नाला गावातील सारी माणसं हुती, नारूआबाबी हुता, माणसं तांदळाला नि मड्याला चुकत न्हाईत त्ये खरचं हाय. नारूआबाच तसच हुंत.. दादा नारुआबाच्या पोरीच्या लग्नाला गेलं न्हाईत, खरं नारूआबा सारं पाठीवर टाकून आला हुता."[७०] यातून कमालीची सामूहिक भावना प्रत्ययास येते. इतकेच काय तर लग्नप्रसंगी सजविलेल्या गाड्या असोत, हलगीचा खेळ असो ह्या सर्वांमधून आपल्याला सामूहिकतेच दर्शन घडतं.

आंदीच्या लग्नानंतर नवऱ्याच्या आजारपणात कुटूंबान साथ सोडली तरी तिच्या नवऱ्याचे जीवाभावाचे दोस्त, सासरचं सारं गाव तिला समूहभावनेतून मदत करतं. मग नवऱ्याच आजारपण असो, पोरींची लग्न असोत, म्हैसीची अडचण असो, देवदेवस्की असो, नवऱ्याचा मृत्यू असो किंवा पोरग्याचं आजारपण असो ह्या सर्व गोष्टींमधून आपल्याला कमालीची सामूहिक भावनाच दिसून येते. अगतीक होऊन आंदी जेव्हा शेजारच्या म्हातारीला म्हणते, "आजे माझ्या जल्मात काय लिवल असलं."[७१] तेव्हा आजी म्हणते, "असु दे, पोरे, कसं असलं तर काढं."[७२] ह्या गोष्टी आपल्याला समूह भावनेतून घडलेल्या दिसून येतात.. आंदी जेव्हा नवरा मेल्यानंतर पहिल्यांदा माहेरी जाते तेव्हा सारं गाव जमतं. आंदी म्हणते, "आमी परत आलो, गाव जमल होतं, घरात उभा ऱ्हायला जागा न्हाई- दारात तेवढीच अन् घरातबी तेवढीच,"[७३] याचबरोबर आंदीच्या प्रसंगांना मदतीला धावणारी रामा चव्हाण, नामूदाजी, शंकरआण्णा, गणपूदाचं कुटूंब ही सारी आंदीला कमालीच्या सामूहिकतेतून मदत करताना दिसून येतात.

## पशू-पक्षी, प्राणी व मातीबद्दल प्रचंड प्रेम :

ग्रामीणत्त्वाचा खरा आविष्कार हा पशूपक्षी, प्राणी व काळी आई यामधून होत असतो. या सर्व घटकांबद्दल ग्रामीण माणसाला कमालीचे प्रेम असते. या सर्व घटकांमध्ये व माणसांमध्ये एक जिव्हाळ्यांचे नाते निर्माण झालेले असते. त्यामुळे पशूपक्षी व प्राण्यांबद्दल कोणत्याही वाईट गोष्टी घडल्यावर ग्रामीण माणसाचे मन तुटून जाते. त्याला खूपच वाईट

वाटते. प्रसंगी ह्या पशू–पक्ष्यांबद्दल व प्राण्यांबद्दल तो 'ओस्काबोस्की' रडतानाही आपल्याला दिसून येतो. या सर्व गोष्टीचं हृदयस्पर्शी चित्रण कृष्णात खोतांनी आपल्याला गावठाण मधून घडविले आहे.

गावठाणची नायिका आंदी व तिचे आईवडील ह्यांना गुरा–ढोरांबद्दल व पशुपक्ष्यांबद्दल कमालीचे प्रेम आहे. आपल्या गोठ्यातील प्राण्यांची ते मुलाबाळाप्रमाणे काळजी घेतात. त्यांची उगानिगा राखतात व त्यांच्या जीवनाशी एकरूप होऊन त्यांना आपल्या कूटूंबाचाच एक अविभाज्य भाग मानतात. त्यामुळे या जनावरांबाबत घडलेली कोणतीही घटना त्यांच्या मनाला चटका लावून जाते. आंदीच्या लग्नासाठी जेव्हा मुलाप्रमाणे सांभाळलेला रेढा विकला जातो तेव्हा आंदीच्या घरी प्रेत झाल्यासारखी अवस्था होते. आई–दादा खूपखूप रडतात. जेवणही घेतं न्हाईत. रेड्याला विकल्यावर आंदी म्हणते, ''माळावर रेडा कुठं हाय आसं माझं मी म्हनी चितागत व्हायची. ध्येनात आलं की हुरदं फाटायचं.''[७४] याचबरोबर लहानपणी आंदीच्या अंगावरनं देण्यासाठी खुराड्यातनं कोंबडी काढली तेव्हाही आंदीचा जीव लाक लाक व्हायला लागला. आंदी म्हणते, ''आईन खुराड्यातनं हूडकून कोंबडी काढली. साऱ्या घरभर कौऽऽ कौऽऽ दंगा झाला. त्यास्नी बी कळतयं माणूस मेल्यावर घरात दंगा हुतोय तसाच दंगा झाला.''[७५] यामधून आपल्याला पशूपक्ष्यांबद्दलचे उत्कट प्रेम दिसून येते.

नारुआबा जेव्हा गायीला मारतो तेव्हा आंदी मनात म्हणते, ''तुला तिचा सराफ लागंल. त्याचबरोबर ढोरं जेव्हा मळणीला जुंपली जातात त्यावेळी त्याचं काम बघून आंदीचं मन भडभडून येतं. ज्यावेळी आंदीची पाडी माजावर येते, तेव्हा घरचाच पाडा तिला गाब घालतो तेव्हा आंदी म्हणते, ''माणसांच्यात सारी नाती, जनावरांच्यात तसं काही नाय. सारी नाती हायतं खरं येळपुरती. त्येच ब्येस हाय.''[७६] या अशा प्रसंगातून तसेच ज्यावेळी गावाचा माळ जळतो. त्यावेळी गुराढोरांची चरण्याची पंचायत झाली म्हणून संपूर्ण गावाच काळीज तुटतं. आंदीलाही खूप वाईट वाटतं. ती म्हणजे, ''दगडाच्याच खालचं घरटं बघिटल, डोळं मिटलं, काल–आज दुपारी त्या घरट्यातल्या पिल्याजवळ बसलो हुतो.

नुसतं डोळं मिटमिट करत्याली घरट्यासकटं जळून खाकं. त्यांची आई कुठे गेली असलं? का त्येंच्याबरोबर जळून गेली असलं? पिलांना आगीत जळताना तिन बघीटल असलं? काय तिचा जीव झाला असलं?''[७७] या प्रश्नांनी आंदीच डोकं सुन्न होते. यामधून तिचे पक्ष्याबद्दलचे कमालीचे प्रेम जाणवते.

त्याचबरोबर रामा सावकारानं घेतलेली म्हैस असू दे, विकलेली पालवं असू देत किंवा खंगत जाणारी गाई असू दे या साऱ्यांसाठी आंदीचा आणि तिचा आई-वडीलांचा जीव तुटताना दिसतो. ज्यावेळी औतणी करण्यासाठी तिचा दादा तिच्या मामाची बैलं घेऊन येतो तेव्हा त्या बैलांना अंग फुटेपर्यंत मारलं तरी जागची हालत नाहीत, परंतु मामा आल्याबरोबर लगेच चालायला लागतात. ह्या प्रसंगाबद्दल आंदी म्हणते, ''मालका बिगार व्ढॉर चालत न्हाई, त्येच खरं करून दाखिवलं.''[७८] यामधून तसेच जेव्हा वाघुजाईला व विठ्ठलाईला बकरी द्यायची असतात तेव्हा तिचा नवरा आंदीला घरातलीच कोकरं देऊया असं म्हणतो तेव्हा आंदीचा जीव तीळतीळ तुटतो. ती मनात म्हणते, ''मला पोरीच्या आणि पोरांच्या नरड्यावर सुरी ठेवल्यागत वाटायला लागलं.''[७९] यामधून तसेच जेव्हा दसरू पाटील हा सावकार आंदीची म्हैस मारतो तेव्हा त्या म्हैसीकडे बघून आंदीचा जीव कासाविस होतो. तिच्या डोळ्याच पाणीच आटतं, मुलागत सांभाळलेली म्हस तिच्या डोळ्यासमोर मरून पडते तेव्हा तिला आभाळ कोसळल्यागत वाटतं. अशा प्रकारच्या अनेक प्रसंगामधून आपल्याला पशूपक्ष्यांबद्दल व प्राण्यांबद्दल दिसणारे कमालीचे प्रेम जाणवते.

याचबरोबर शेतकरी माणसाला शेतातल्या मातीबद्दल प्रचंड प्रेम असते. तो त्या मातीशी इमान राखतो, काळी आई त्याचं सर्वस्व असते. म्हूणन आंदी म्हणते, ''कुरवाड्याला आपल्या रानात गेल्याल साऱ्याचा ईसूर पडतोय, त्येचं दुखण-कुपणं सारं इरगाळून जातय, मातीचा गुणच न्यारा. त्येच्यासंग तिनं बलीवली तर बोलतीया. हासीवलं तर हसतीया माती. त्यातचं त्यो जगतोय नि त्यातचं खपतोयं.''[८०] अशा या चित्रणातून आपल्याला ग्रामीण भागामध्ये मातीबद्दल असणारे प्रचंड प्रेम दिसून येते. अशापद्धतीने

कादंबरीमध्ये येणारी गुरं–ढोरं, पशुपक्षी, शेळ्या–मेंढ्या, कोंबडी–कुत्री, मांजरं यांच्यावर ग्रामीण माणसाचं असणारं कमालीच प्रेमच आपल्याला दिसून येते.

**निष्कर्ष :**

१) गावठाण मधून ग्रामीण समाजजीवनाचा सर्वांगिण अविष्कार होताना दिसून येतो.

२) गावठाण मधून ग्रामीण भागातील असह्य दारिद्रय प्रत्ययास येते.

३) शेतकरी जीवनाचा खराखुरा पट अतिशय जिवंतपणे गावठाण मधून उभा राहताना दिसतो.

४) ग्रामीण भागामधून असणारा सावकारीचा पाशही आपल्याला गावठाण मधून डोकावताना दिसतो.

५) ग्रामीण समाजातील अंधश्रद्धा आपल्याला 'गावठाण' वाचत असताना प्रकर्षाने जाणवतात.

६) त्याचबरोबर श्रद्धा युक्त भोळ्या समजूतींचा प्रत्यय येतो व ग्रामीण माणसांची गावच्या पांढरीवर, वाघुजाईवर, तांबुजाईवर, विठ्ठलाईवर असणारी श्रद्धा दिसून येते.

७) गावठाण मधून निसर्गाचा लहरीपणा चित्रित झाल्याचे दिसते.

८) ग्रामीण समाजाच्या अविभाज्य असलेल्या रूढी, प्रथा, परंपरा याचे उत्कट दर्शन आपल्याला गावठाण मधून होते.

९) औद्योगिकरणामुळे झालेले खेड्याचे संक्रमण आपल्याला 'गावठाण' मधून दिसून येते.

१०) माणसामाणसातील कमालीच्या प्रेमाचा आपणास प्रत्यय येतो.

११) ग्रामीण भागातील कौटुंबिक संघर्षाचेही दर्शन प्रत्ययकारी होते.

१२) रक्ताच्या नात्यातील तुटलेपण आपल्याला गावठाण वाचत असताना प्रकर्षाने जाणवते.

१३) ग्रामीण समाजाच्या सामूहिक जीवनाचे भावस्पर्शी चित्रण गावठाण मध्ये दिसून येते.

१४) शेतकऱ्याच्या शेतमालाच्या परवडीचे चित्रणही दिसून येते.

१५) ग्रामीण भागातून दिसणारे पशु-पक्षी, प्राणी व मातीबद्दल प्रचंड प्रेम आपल्याला गावठाण मध्ये पदोपदी आढळून येते.

## सारांश :

सदर प्रकरणात 'गावठाण' मधील अनुभवांची सामाजिकता मांडताना तेथील ग्रामीण समाजजीवनाचा आढावा घेतला. तसेच ग्रामीण जीवनात येणारा असह्य दारिद्रयाचा पदर उलघडून दाखवला. त्याचबरोबर गावठाण मधून चित्रित होणाऱ्या शेतकरी जीवनाची यथार्थपणे चर्चा केली. तसेच ग्रामीण भागातील दिसणारा सावकारीचा पाश, गावातील श्रद्धा, रुढी, परंपरा, अंधश्रद्धा या सर्व गोष्टींची सखोल मीमांसा केली. त्याचबरोबर लहरीनिसर्गाच्या गावठाणमधील दर्शनाचा उहापोह केला. बदलत्या काळाचे संक्रमण गावठाणच्या रूपाने तपासून पाहिले. तसेच ग्रामीण भागातील माणसामाणसातील कमालीच्या प्रेमाची चिकित्सा केली. त्याचबरोबर ग्रामीण भागातील दिसणारा कौटुंबिक संघर्ष, नात्यातील तुटलेपण या गोष्टींचा गावठाणच्या माध्यमातून चिकित्सक अभ्यास केला. तसेच कादंबरीतून दिसणाऱ्या शेतकऱ्याच्या शेतमालाची परवड तसेच ग्रामीण माणसाला असणारं पशु-पक्षी, प्राणी व माती यांच्याबद्दलचे कमालीचे प्रेम या गोष्टींची सखोल अशी मीमांसा केली, योग्य तिथे संदर्भाची नोंद देऊन प्रकरणाचा उहापोह केला.

## संदर्भसूची :

१) दिगंबर पाध्ये– 'साहित्य समाज आणि संस्कृती'– न्यू एज प्रिटींग प्रेस, मुंबई, पृ.८.
२) विद्या व्यवहारे. 'साहित्य विमर्श' चिन्मय प्रकाशन' औरंगाबाद , पृ. ६२.
३) दिगंबर पाध्ये – 'साहित्य समाज आणि संस्कृती'– न्यू एज प्रिटींग प्रेस, मुंबई, पृ.१३.
४) कृष्णात खोत, 'गावठाण' मौज प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २००५, पृ.१६.
५) तत्रैव, पृ. १७.
६) तत्रैव, पृ. २१.
७) तत्रैव, पृ. ४२.
८) तत्रैव, पृ. ४३.
९) तत्रैव, पृ. ४४.
१०) तत्रैव, पृ. ५६.
११) तत्रैव, पृ. ६४.
१२) तत्रैव, पृ. ८३
१३) तत्रैव, पृ. २.
१४) तत्रैव, पृ. २०
१५) तत्रैव, पृ. २२.
१६) तत्रैव, पृ. २५.
१७) तत्रैव, पृ. ६३.
१८) तत्रैव, पृ. ८.
१९) तत्रैव, पृ. १०.
२०) तत्रैव, पृ. १०.
२१) तत्रैव, पृ. ४५.

२२) तत्रैव, पृ. ४५.

२३) तत्रैव, पृ. ९९.

२४) तत्रैव, पृ. १३.

२५) तत्रैव, पृ. १४.

२६) तत्रैव, पृ. १४.

२७) तत्रैव, पृ. ७५.

२८) तत्रैव, पृ. ९२.

२९) तत्रैव, पृ. १.

३०) तत्रैव, पृ. १.

३१) तत्रैव, पृ. १.

३२) तत्रैव, पृ. २.

३३) तत्रैव, पृ. २७.

३४) तत्रैव, पृ. २९.

३५) तत्रैव, पृ. ५४-५५.

३६) तत्रैव, पृ. ५६.

३७) तत्रैव, पृ. ७२.

३८) तत्रैव, पृ. ७३.

३९) तत्रैव, पृ. ८१.

४०) तत्रैव, पृ. २६.

४१) तत्रैव, पृ. २६.

४२) तत्रैव, पृ. ६१.

४३) तत्रैव, पृ. २१.

४४) तत्रैव, पृ. ३५.

४५) तत्रैव, पृ. ४१.

४६) तत्रैव, पृ. ४०.

४७) तत्रैव, पृ. ३७-३८.

४८) तत्रैव, पृ. ४८.

४९) तत्रैव, पृ. ६४.

५०) तत्रैव, पृ. ६८.

५१) तत्रैव, पृ. ५९.

५२) तत्रैव, पृ. ६२.

५३) तत्रैव, पृ. ६२-६३.

५४) तत्रैव, पृ. ६५-६६.

५५) तत्रैव, पृ. ६७.

५६) तत्रैव, पृ. ७०.

५७) तत्रैव, पृ. ८७.

५८) तत्रैव, पृ. ६३-६४.

५९) तत्रैव, पृ. ६४.

६०) तत्रैव, पृ. ७०.

६१) तत्रैव, पृ. ७१.

६२) तत्रैव, पृ. ७४.

६३) तत्रैव, पृ. ७५.

६४) तत्रैव, पृ. ९१.

६५) तत्रैव, पृ. ९३.

६६) तत्रैव, पृ. ९३.

६७) तत्रैव, पृ. ८५.

६८) तत्रैव, पृ. २७.

६९) तत्रैव, पृ. २७.

७०) तत्रैव, पृ. ४७.

७१) तत्रैव, पृ. ६५.

७२) तत्रैव, पृ. ६५.

७३) तत्रैव, पृ. ८८.

७४) तत्रैव, पृ. ४०.

७५) तत्रैव, पृ.१५.

७६) तत्रैव, पृ. ३१.

७७) तत्रैव, पृ. ३३.

७८) तत्रैव, पृ. ६१.

७९) तत्रैव, पृ. ८०.

८०) तत्रैव, पृ. ८३.